**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**नअ/०२२२६५/चौकशी दि.३१.०३.२०२३**

**<u>विषयः- नगर अभियंता खात्यातील दुय्यम अभियंता (वास्तूशास्त्रज्ञ) पदांच्या सुधारीत अर्हता.</u>**

नगर अभियंता खात्यातील दुय्यम अभियंता (वास्तूशास्त्रज्ञ) पदांच्या सुधारित अर्हतांना मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि. १०.०३.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/३९२२/डी अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सर्व खाते प्रमुख/ विभाग अधिकारी यांना कळविण्यात येते की, संबंधित कर्मचारी वर्गाकडून या सुधारित अर्हतांची नोंद करुन घेण्यासाठी हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रक आपल्या विभागीय कर्मचा-यांना प्रसृत करावे व ते ठळकपणे सूचना फलकावर लावून त्यास जास्तीत जास्त प्रसिध्दी दयावी.

**नगर अभियंता (प्र)**

प्रतः- ..................................................यांना माहितीसाठी कृपया अग्रेषित.

**सह प्रमुख कर्मचारी अधिकारी**
**नगर अभियंता**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि. १०.०३.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/३९२२/डी अन्वये मंजूरी दिलेल्या दुय्यम अभियंता (वास्तूशास्त्रज्ञ) पदाच्या सुधारीत अर्हता.**

**सरळसेवेने**

१)उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास खुल्या प्रवर्गाकरिता वय ३८ वर्षापेक्षा व मागासवर्गीयांकरिता वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच वयाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका/शासनाने वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

२. ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुशास्त्रातील पदवी प्राप्त केली आहे.

**किंवा**

जे रॉयल इन्स्टिटयूट ऑफ ब्रिटिश आर्किटेक्टस् या संस्थेचे सहयोगी सभासद आहेत.

किंवा

ज्यांनी कलाभवन बडोदा या संस्थेची वास्तुशास्त्रातील पदविका प्राप्त केली आहे.

**किंवा**

ज्यांनी महाराष्ट्र सरकारची (पूर्वीचे मुंबई सरकार) तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील शासकीय पदविका प्राप्त केली आहे.

किंवा

ज्याने आर्किटेक्टस ॲक्ट १९७२ च्या कलम ३५ (२) चा (१९७२ चा क्र. २०) अन्वये कौन्सिल ऑफ आर्किटेक्टस या संस्थेने रजिस्टर ऑफ आर्क्टिेक्टस् मध्ये नोंदणीसाठी मान्य केलेल्या समकक्ष अर्हता प्राप्त केल्या आहेत.

३) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४) केंद्र सरकारने आर्किटेक्टस् ॲक्ट १९७२ च्या कलम ३५ (२) अन्वये (१९७२ चा क्र.२०) प्रस्थापित केलेल्या कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर तर्फे ठेवण्यात येणा-या रजिस्टर ऑफ आर्किटेक्चरमध्ये नांव नोंदविणे आवश्यक आहे. तथापि उमेदवाराचे नाव रजिस्टर ऑफ आर्किटेक्चरमध्ये नोंदविले नसल्यास उमेदवाराने नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

५) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

सही/- ०२.०२.२०२३
**नगर अभियंता**

सही/-३.०२.२०२३
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**

सही/- १५.०२.२०२३
**संचालक (अ.से.व प्र)**

सही/-२०.०२.२०२३
**सह आयुक्त (साप्र)**

सही/- १.०३.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)**

**सही/-१०.०३.२०२३**
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)**